# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.०५.२०२१**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (०७.०५.२०२१ ते १३.०५.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४.०५.२०२१ ते १८.०५.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ०.० | ०.० | २.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ४ | ३ | ० | ६० | ७२ |
| ३५.९ | ३६.५ | ३७.० | ३६.७ | - | ३७.९ | - | कमाल तापमान (अं.से.) | ३९ | ४१ | ४० | ३२ | २९ |
| २३.७ | - | २४.३ | २४.१ | २४.२ | २३.८ | - | किमान तापमान (अं.से.) | २६ | २८ | ३० | २६ | २६ |
| ३ | ८ | ८ | २ | १ | ३ | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८२ | - | ९२ | ८९ | ८८ | ८९ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ५३ | ५६ | ८४ | ८८ |
| ७० | ६८ | ७३ | ८७ | - | ५६ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३३ | २५ | २५ | २६ | ७९ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | १४ | ३३ | ४५ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा. | पु.ई. | पु.ई. | आ. | द. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक १४ ते १८ मे दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची व दिनांक १४ व १५ मे रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची व दिनांक १७ व १८ मे रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.कमाल तापमान ३२.० ते ४१.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २६.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५६ ते ८८% तर दुपारची सापेक्ष आद्रता २५ ते ७९% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०७ ते ४५ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>**इशारा :**<br>➢ **सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १४ मे रोजी तुरळक ठिकाणी मेघ गर्जना व विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.**<br>➢ **सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १६ मे रोजी तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.** |
| **सामान्य सल्ला** | | ➢ **शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.**<br>➢ पावसाळ्यामध्ये जमिनीची धूप होऊ नये म्हणून शेतामधील बांधबंदिस्तीची कामे करून घ्यावीत.<br>➢ कृषि विद्यापीठ/ कृषि विभाग, राज्य शासन यांनी दिलेल्या मार्गदर्शकतत्त्वांनुसार माती परीक्षण करून घ्यावे. माती परीक्षणाने आपण पिकांना आवश्यक तेवढीच खते घालू शकतो परिणामी अतिरिक्त खतांवर होणारा खर्च वाचतो.<br>**शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ पक्व झालेल्या (८०%) पिकांची त्वरित काढणी करावी.<br>➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.<br>➢ वाऱ्याच्या वेगामुळे फळ पिक तसेच भाजीपाला पिके उन्मळून पडण्याची शक्यता असल्याने त्यांना आधार द्यावा.<br>➢ जनावरांच्या गोठे वाऱ्याच्या वागामध्ये सुरक्षित राहतील याची काळजी घ्यावी.<br>➢ जनावरे गोठ्यांमध्ये सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>➢ वादळाची शक्यता असल्याने जनावरांना चारावयास नेऊ नये.<br>**शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबू च्या सहय्याने आधार द्यावा.<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये.<br>➢ शेतकऱ्यांनी नोवेल कोरोना व्हायरस या संसर्गजन्य रोगाच्या प्रसार व प्रादुर्भाव यापासून बचावासाठी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे तसेच स्वतःची काळजी घ्यावी. शेतामध्ये काम करतेवेळी आपल्या हाताचा डोळे, तोंड आणि नाक यांना स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>➢ शेतामध्ये काम करत असताना शेतकरी बांधवांनी सामाजिक अंतर पाळावे तसेच तोंडाला मास्क किंवा स्वच्छ रुमाल बांधावा, वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणारे रसायन किंवा साबण यांनी हात स्वच्छ धुवावेत. |
| **संदेश** | | सांगली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, जोरदार वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. काढलेला शेतीमाल सुरक्षित ठेवावा, जनावरे सुरक्षित बांधावीत, शेतकरी बंधूनी स्वतःची काळजी घ्यावी. |
| **मका** | पक्वता | ➢ पक्व झालेल्या मका पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **भुईमुग** | पक्वता | ➢ भुईमुग पिक काढण्यायोग्य तयार झाले म्हणजे पाने पिवळी पडू लागतात. शेंगांचे टरफल टणक व टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागल्यास पिकाची काढणी वरून भुईमुगाच्या शेंगा चांगल्या वाळवून साठवणूक करावी. |
| **सुर्यफुल** | पक्वता | ➢ पक्व झालेल्या सुर्यफुल पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **ऊस** | वाढीची अवस्था | ➢ सुरु ऊस लागवडीनंतर १६ ते १८ आठवड्यांनी रासायनिक खतांची मात्र देऊन पहारीच्या औजराने वरंबे फोडून आंतर मशागत करावी व सायन कुळव रिजरने मोठी बांधणी करावी. पाणी देण्यासाठी सऱ्या वरंबे दुरुस्त करून द्यावेत.<br>➢ मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १०० किलो (युरिया २१७ किलो), स्फुरद ५५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ३४४ किलो) व पालाश ५५ किलो(म्युरेट ऑफ पोटॅश ९२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी.<br>**पिक संरक्षण**<br>➢ **खोड किडी :** उसामध्ये खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास एकरी दोन फुले ट्रायकोकार्ड १० ते १५ दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ वेळा वापरावीत.<br>➢ **हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. आगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकूण त्यांचा नाश करावा. |
| **द्राक्ष** | नवीन फुट | ➢ नवीन लागवड केलेल्या द्राक्ष बागांसाठी किंवा एप्रिल महिन्यामध्ये छाटणी केलेल्या बागांमध्ये फुलकिडींचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पुढील किटकनाशकांची स्पिनोसॅड ४५ एस.सी. @ ०.२५ मिली प्रती लिटर पाणी **किंवा** इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. @ ०.२२ ग्रॅम प्रती लिटर पाणी **किंवा** फिप्रोनील ८० डब्ल्यू. जी. @ ०.०६२५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात नवीन फुटीवर ५ किंवा ५ पेक्षा जास्त फुलकिडे आढळून आल्यास नियमित फवारणी करावी |
| **केळी** | वाढीची | ➢ मेघ गर्जना व जोरदार वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने केळी झाडांना आधार द्यावा. |
| **डाळिंब** | विश्रांती काळ | हस्त बहार- विश्रांती काळ<br>➢ झाडांच्या विश्रांतीच्या काळामध्ये जर शॉट होल बोरर किंवा स्टेम बोरर चा प्रादुर्भाव दिसून आल्यास थाईमेथोक्झाम २५% डब्ल्यू.जी. १० ग्रॅम + प्रोपीकोणाझोल २५% ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून आळवणी करावी. |
| **कांदा** | पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या उन्हाळी कांदा पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांना लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्यावयात.<br>➢ जनावरे सावलीमध्ये बांधावीत. जनावरांना शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे.<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |
| **पूर्व मशागत** | पूर्व मशागत | ➢ खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत (नांगरणी) करून घ्यावी. खरीप हंगामामध्ये कडधान्य पिक घेण्यासाठी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात व शेवटच्या कुळवणी अगोदर हेक्टरी ५ टन कंपोस्ट/शेणखत शेतात मिसळावे. |

स्त्रोत

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. :१३.०५.२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**